॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431 606 (Maharashtra)

NAAC Re-accredited with 'A'Grade

## FINANCE & ACCOUNTS DEPARTMENT

| Phone : (02462) 229540<br>Fax : (02462) 229572 | Website:<br>Srtmun.ac.in | E-Mail :<br>faosrtmun@gmail.com |
|---|---|---|

संदर्भ : लेखा/वेतन/२०२२-२३/ ९८८४ दिनांक :- ०९.१२.२०२२

## सन २०२२-२३ आयकर संबंधीत परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठातील शासनमान्य पदावरील अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यापीठ निधीतून कायम आणि ठरावीक वेतन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना कळविण्यांत येते की, आपल्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या आयकराची गणना करण्यासाठी आपली माहिती सोबत जोडलेल्या एक्सेल फाईलमध्ये भरुन लेखा विभागाच्या **salary@srtmun.ac.in** या मेल आयडीवरती **दि. २४.१२.२०२२** पर्यंत देण्यात यावी. **सोबत जोडलेल्या एक्सेल फाईलमध्ये कोणताही बदल करण्यात येवू नये. सदर फाईल प्रथम आपल्या संगणकावर डाऊनलोड करावी, माहिती भरुन ती फाईल वेतन विभागाच्या इमेलवर अटॅच करुन पाठवावी. जर सदर फाईलमध्ये कांही बदल केल्यामुळे आयकर गणनेत चुका झाल्यास त्यास लेखा विभाग जबाबदार राहणार नाही.**

| | |
|---|---|
| Emp. Name | कर्मचाऱ्याचे नांव |
| Emp. Code | कर्मचाऱ्यांचा क्रमांक जो NT/UFNT/TG/UFTG यापासून सुरुवात होतो. |
| Other Income | वेतनाव्यतीरिक्त इतर मार्गाने प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा तपशील |
| House Rent | जर आपण भाड्याने राहत असाल तर घरमालकाकडून रशिद तिकीट लावून पावती घेण्यात यावी.<br>एक लाखापेक्षा जास्तीची पावती असेल तर घरमालकाचे पॅन कार्ड आवश्यक आहे. |
| Housing Loan Interest | गृहकर्ज घेतले असेल तर त्यावरील व्याजाची रक्कम (बँकेकडून प्रमाणपत्र घेवून त्यावरील रक्कम द्यावी) |
| Housing Loan Principal | गृहकर्ज घेतले असेल तर कर्जातील मुळ रक्कम (बँकेकडून प्रमाणपत्र घेवून त्यावरील रक्कम द्यावी) |
| LIC (Other Salary) | वेतनाव्यतिरिक्त आपण रोख स्वरुपात भरत असलेल्या विमाचा हप्ता (वर्षभराचा) |
| PPF | पीपीएफ रक्कम |
| NSC | एनएससी ची रक्कम |
| PLI | पोष्टामध्ये भरत असलेला विमा |
| Sukanya | पोष्टामध्ये भरतअसलेल्या सुकन्या योजनेची रक्कम |
| Tution Fees | पाल्यांच्या शाळेत/महाविद्यालयात भरत असलेली केवळ ट्युशन फिसची रक्कम (फक्त दोन पाल्यांसाठी) |
| Other | वरील बचती व्यतिरिक्त कांही बचत असेल तर. (ज्याचा समावेश वेतनात अथवा वरील बचतीत नाही.) |
| Eduction Loan Interest | पाल्याच्या शिक्षणाकरीता घेतलेल्या बँक कर्जावरील व्याजाची रक्कम |
| 80 U (Only for Disabled) | कर्मचारी अथवा पाल्य अपंग असल्यामुळे मिळत असलेला फायदा |
| 80 D (Health Insurance) | वैद्यकीय विमा काढला असेल तर त्याची रक्कम |
| 80ccd (Pension Scheme) | निवृतीवेतन योजनेत कांही रक्कम भरत असाल तर त्याची रक्कम (वेतनातील कपाती व्यतिरिक्त) |
| Mobile No. | स्वत:चा मोबाईल क्रमांक |
| Bank Account Number | वेतन जमा होत असलेले बँक खाते. |

वरील माहितीतील कांही माहिती निरंक असेल तर अशा ठिकाणी ० (शुन्य) द्यावे. **Employee Code** हा अत्यंत महत्वाचा असून जर त्यात कांही चूक झाली तर होणाऱ्या चुकीस आपण स्वत: जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी. जर आपणास आपला **Employee Code** माहित नसेल तर आस्थापना विभागातून तो घेवून अचूक नंबर द्यावा.

...२

इतर मार्गापासून मिळणारे उत्पन्न आयकर गणणेसाठी दर्शविण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. आपण सदर उत्पन्न आयकर गणणेसाठी लेखा विभागास न कळविल्यास त्यास लेखा विभाग जबाबदार राहणार नाही अथवा या अनुषंगाने जर आयकर विभागाकडून नोटीस प्राप्त झाली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. **तसेच लेखा विभागास बचतीचा ई-मेल केल्यानंतर मार्च-२०२३ पर्यंत इतर मार्गापासून मिळणारे उत्पन्न प्राप्त झाल्यास ते लेखा विभागास कळविण्याची जबाबदारी आपली राहील.**

तसेच, वरील माहिती भरून आपल्या ई-मेलव्दारे लेखा विभागास पाठविल्यानंतर त्यामध्ये कांही बदल असल्यास वेतन विभागात प्रत्यक्ष भेटून बदल करण्यात यावेत. दुसरा मेल विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**वरील दिनांकापर्यंत आपल्या बचतीचा तपशील लेखा विभागास प्राप्त न झाल्यास लेखा विभागातील उपलब्ध माहितीनुसार आपली आयकराची गणना करून आपल्या वेतनातून आर्थिक वर्षे २०२२-२३ चा आयकर पुढील तिन महिन्यात समान हप्त्यात कपात करण्यात येईल.**

**आपण सादर केलेल्या बचतीच्या, गृहकर्जाचे बॅंक प्रमाणपत्र व घरभाडयाची पावती इत्यादी दिनांक ०६/०२/२०२३ पर्यंत लेखा विभागात सादर करण्यात याव्यात. अन्यथा सदर बचत विचारात न घेता आयकर गणना करण्यात येईल.**

**तसेच लेखा विभागास बचतीचा तपशील सादर करताना सोबत दिलेल्या मायक्रोसॉफ्ट वर्ड फाईलची प्रिंट काढून त्यामध्येच भरून दयावा.**

**टीपः लेखा विभागाच्या दि. १५.१२.२०२० रोजीच्या परीपत्रकानुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या आयकर गणनेसाठी New Tax Regime किंवा Old Tax Regime बाबतचा योग्य पर्याय निवडुण लेखा विभागास लेखी स्वरूपात दि. २४.१२.२०२२ पुर्वी कळविण्यात यावे.**

**प्र. वित्त व लेखाधिकारी**

**प्रतः श्री. ए.ए.दर्शनकार, सिस्टीम एक्सपर्ट, संगणक केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ,** यांना देवून कळविण्यात येत की, सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या संकेस्थळावर अत्यंत महत्वाचे म्हणुन दर्शविण्यात यावे.